# महावितरण
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

**CIN: U40109MH2005SGC153645**

**औद्योगिक संबंध विभाग,**
**प्रकाशगड, प्लॉट जी-९,४ था मजला,**
**प्रा.अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व),**
**मुंबई-५१.**
**दूरध्वनीक्र.६९८५२२००**
**Email:ciro@mahadiscom.in**
irdho123@gmail.com
**website- www.mahadiscom.in**


---

जा.क्र.:औसंवि/ब/३६५१६ दिनांक: १४.११.२०२५

## परिपत्रक

**विषय :-** महावितरण कंपनीतील माहे ऑक्टोबर २०२४ ते माहे ऑक्टोबर २०२५ या विमा योजनेच्या कालावधीत सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी हॅप्पी फॅमिली फ्लोटर पॉलीसी - २०२४ (वर्ष २०२५-२६) विशेष मेडीक्लेम विमा योजना लागू करणेबाबत.

**संदर्भ :-** या कार्यालयाचे परिपत्रक क्र.१३८४२ दि.०८.०५.२०२४

****

म.रा.वि.मं. सुत्रधारी कंपनी मर्यादित अंतर्गत महावितरण, महानिर्मिती व महापारेषण कंपनीतील कार्यरत कर्मचारी व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या कुटूंबातील ०५ सदस्यांसाठी MSEB HCL Group Mediclaim Policy सन-२०१५ पासुन सुरु आहे.

सदर योजनेचा लाभ आरोग्याच्या सुरक्षितेतच्या दृष्टीकोनातुन सेवानिवृत्तीनंतरही कर्मचाऱ्यांना मिळावा अशी आग्रही मागणी तिन्ही कंपन्यांतील कामगर संघटनेने वेळोवेळी केली असून तसेच, सद्यस्थितीत चालु असलेल्या योजनेच्या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांनीही केलेली आहे. त्यानुषंगाने महावितरण कंपनीतील माहे ऑक्टोबर २०२४ ते माहे ऑक्टोबर २०२५ या विमा योजनेच्या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांकरीता "हॅप्पी फॅमिली फ्लोटर पॉलीसी" रु. ३.०० लाख अथवा रु. ५.०० लाखांकरीता (सेवानिवृत्त कर्मचारी व पत्नी ) अशी विशेष मेडिक्लेम योजना दि ओरिएन्टल इन्शुरन्स कंपनी लि. यांच्यामार्फत सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी स्वत: वैयक्तीकपणे हफ्ता भरण्याच्या अटींवर सुरु करण्यात येत आहे. सदर योजना ऐच्छीक स्वरुपाची आहे.

सदर योजना माहे ऑक्टोबर २०२४ ते माहे ऑक्टोबर २०२५ या विमा योजनेच्या कालावधीत सेवानिवृत्त होणाऱ्या झालेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना खालीलप्रमाणे विमा हप्ता लागू राहील. तसेच, सदर विमा हप्ता दि ओरिएन्टल इन्शुरन्स कंपनी लि. मुंबई यांच्याकडे सेवानिवृत्त कर्मचाऱ्याने स्वत: वैयक्तीकपणे परिपत्रकातील नमूद अधिकारी वर्गाशी समन्वय साधून भरावयाचा आहे.

**हॅप्पी फॅमिली फ्लोटर पॉलिसीची वैशिष्ट्ये :**

- ❖ हॅप्पी फॅमिली फ्लोटर पॉलिसी -२०२५ (वर्ष २०२५-२६) ही रु. ३.०० लाख अथवा रु. ५.०० लाखांकरीता असून यामध्ये सेवानिवृत्त कर्मचारी व पत्नी (१+१) असा समावेश राहील.
- ❖ माहे ऑक्टोबर २०२४ ते माहे ऑक्टोबर २०२५ या विमा योजनेच्या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यास सदर योजनेचा लाभ सलगपणे घ्यावयाचा झाल्यास दि. २५.११.२०२५ पूर्वी विमा हप्ता विमा कंपनीस जमा करणे बंधनकारक आहे. तसेच, दि. २५.११.२०२५नंतर विमा हप्ता कंपनीस जमा झाल्यास अशा सेवानिवृत्त कर्मचाऱ्याला सदर योजनेचा लाभ सलगपणे मिळणार नाही.

❖ **सदर योजनेमध्ये खालील लाभ देय राहतील.**

- पॉलिसी घेतल्यानंतर पहिल्या दिवसापासून विमा संरक्षण सुरु. (सातत्य कवर - कॉरपोरेट पॉलिसीमध्ये उपलब्ध माहितीच्या अधीन)
- विमा कंपनीच्या माध्यमातून नियुक्त केलेल्या TPA कंपनीच्या पॅनलवर असलेल्या हॉस्पिटलमध्ये उपचार घेतल्यास कॅशलेस सुविधा उपलब्ध राहील.
- आजारपणासाठी साधारण रुममध्ये भरती झाल्यास विमा राशीच्या १% रक्कम प्रति दिवसासाठी खोली भाडे लागू राहील.
- आजारपणासाठी अतिदक्षता विभागात भरती झाल्यास विमा राशीच्या २% रक्कम प्रति दिवसासाठी खोली भाडे लागू राहील.
- एकूण मंजूर विमा दाव्याच्या रक्कमेपैकी १०% रक्कम ही सेवानिवृत्त कर्मचाऱ्यास स्वत:ला भरावी लागेल.
- वैद्यकीय उपचाराकरीता कर्मचारी यांना मंजूर प्राप्त झाल्यानंतर रुग्णालयात दाखल होण्यापूर्वी ३० दिवस अगोदर घेतलेल उपचार व रुग्णालयातून डिस्चार्ज झाल्यानंतर ६० दिवसापर्यंत डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार होणारा खर्च योजनेत अनुज्ञेय राहील.
- आयकर कलम ८० डी नुसार सुट मिळेल व त्याबाबतचे प्रमाणपत्र विमा कंपनीमार्फत सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या मागणीप्रमाणे देण्यात येईल.
- आधुनिक उपचार आणि आगाऊ शस्त्रक्रिया याबाबतची सविस्तर माहिती पॉलिसीमध्ये नमूद आहे याची नोंद घ्यावी.
- वरील व इतर अधिक माहितीसाठी हॅप्पी फॅमिली फ्लोटर पॉलिसीची ठळक वैशिष्ट्ये सोबत जोडली आहेत.

❖ **हॅप्पी फॅमिली फ्लोटर पॉलीसी - २०२४ (वर्ष २०२५ -२६) ही ऐच्छीक** असून, विमाधारक हयात असेपर्यंत नुतनीकरण विमा कंपनीच्या अटी व शर्तीनुसार विहीत मुदतीमध्येच नुतनीकरण करु शकतील. सबब, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची योजनेची मुदत संपण्यापुर्वी विमा कंपनीकडून नुतनीकरण करुन घ्यावे.

❖ **हॅप्पी फॅमिली फ्लोटर पॉलीसी - २०२४ (वर्ष २०२५ -२६)** साठी खालीलप्रमाणे विमा योजनेचा हप्ता राहील सदर विमा हप्ता हा वैयक्तिकपणे भरावयाचा आहे.

| पॉलीसी | विमा राशी | वयोगटाचा तपशील | प्रिमिअम (Zone-II (Zone I) सोडुन इतर भागातील हॉस्पिटलच्या खर्चाकरीता) | प्रिमिअम (Zone I) मुंबई, ग्रेटर मुंबई, गुजरात व दिल्ली NCR भागातील हॉस्पिटलच्या खर्चाकरीता) |
|---|---|---|---|---|
| हॅप्पी फॅमिली फ्लोटर पॉलीसी - २०२४ (वर्ष २०२५ -२६) | रु.३.०० लाख (निवृत्त कर्मचारी व पत्नीकरीता) | कर्मचाऱ्याचे वय ५८ ते ६०, पत्नीचे वय ५६ ते ६० | रु.२२,७४०/- | रु.२२,७६२/- |
| | | कर्मचाऱ्याचे वय ५८ ते ६०, पत्नीचे वय ४६ ते ५५ | रु. १८,३७९/- | रु.१८,५०२/- |
| | | कर्मचाऱ्याचे वय ६१ ते ६५, पत्नीचे वय ५६ ते ६० | रु.२६,८६९/- | रु.२७,१८८/- |
| | | कर्मचाऱ्याचे वय ६१ ते ६५, पत्नीचे वय ५१ ते ५५ | रु.२२,५०८/- | रु.२२,९२८/- |
| हॅप्पी फॅमिली फ्लोटर पॉलीसी - २०२४ (वर्ष २०२५ -२६) | रु.५.०० लाख (निवृत्त कर्मचारी व पत्नीकरीता) | कर्मचाऱ्याचे वय ५८ ते ६०, पत्नीचे वय ५६ ते ६० | रु.३१,४१०/- | रु.३१,४३६/- |
| | | कर्मचाऱ्याचे वय ५८ ते ६०, पत्नीचे वय ५१ ते ५५ | रु. २५,७७०/- | रु.२५,७८९/- |
| | | कर्मचाऱ्याचे वय ६१ ते ६५, पत्नीचे वय ५६ ते ६० | रु.३५,६००/- | रु.३६,०२८/- |
| | | कर्मचाऱ्याचे वय ६१ ते ६५, पत्नीचे वय ५१ ते ५५ | रु.२९,९६०/- | रु.३०,३८१/- |

❖ **हॅप्पी फॅमिली फ्लोटर पॉलीसी - २०२४ (वर्ष २०२५ -२६) करीता खालील कागदपत्रे आवश्यक आहेत.**

- सेवानिवृत्त कर्मचाऱ्याने प्रस्ताव पत्र स्वत: संपूर्ण भरुन देणे. (नमुना सोबत जोडला आहे.)
- प्रत्येकी दोन आय कार्ड (पासपोर्ट) साईझचे फोटो.
- सेवानिवृत्त कर्मचाऱ्याच्या ओळखपत्राची (आयकार्डची) छायांकीत प्रत.
- पॅनकार्ड किंवा आधारकार्डची प्रत

❖ माहे ऑक्टोबर २०२४ ते माहे ऑक्टोबर २०२५या विमा योजनेच्या कालावधीत सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यास हॅप्पी फॅमिली फ्लोटर पॉलीसी -२०२४ (वर्ष २०२५-२६) ही योजना घ्यावयाची असल्यास प्रस्ताव पत्रात संपूर्ण माहिती भरुन विमा हप्त्याच्या धनादेशासह दि.२५.११.२०२५ पुर्वी प्रस्ताव ओरिएन्टल इन्शुरन्स कंपनीकडे खालील पत्त्यावर पाठवावा.

| |
|---|
| **पॉलीसीचा लाभ घेण्यासाठी खालील अधिकारी वर्गाशी संपर्क साधावा**<br>**श्री सचिन खानविलकर, व्यवस्थापक,**<br>दि ओरिएन्टल इन्शुरन्स कंपनी लि.<br>कॉर्पोरेट बिझनेस ऑफिस-१,४ था मजला,<br>ओरिएन्टल हाऊस, ७ जे टाटा रोड, चर्चगेट,<br>मुंबई -४०० ०२०<br>**दूरध्वनी क्रमांक** ७०३९७१३४१७<br>**ईमेल** - sachin.khanvilkar@orientalinsurance.co.in |
| **श्रीमती शिल्पा पवार, उपव्यवस्थापक**<br>दि ओरिएन्टल इन्शुरन्स कंपनी लि.<br>**दूरध्वनी क्रमांक** -७०३९७१३४१७<br>**ईमेल - shilpa.pawar@orientalinsurance.co.in** |

सदर परिपत्रक महावितरण कंपनीच्या www.Mahadiscom.co .in या संकेत स्थळावरील Employee Portal अंतर्गत Mediclaim व Circular - Industrial Relations Department येथे उपलब्ध असून त्याची मुद्रांकीत प्रत प्रसारीत करण्यात येणार नाही.

(संजय रा.ढोके)
**मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी**

**प्रति**
सर्व कार्यकारी अभियंता तत्सम व त्यावरील दर्जाचे अधिकारी, महावितरण

**प्रत माहितीस्तव सविनय सादर :-**
१. संचालक (वित्त) म.रा.वि.मं. सुत्रधारी कंपनी मर्या. हॉंगकॉंग बँक इमारत, फोर्ट, मुंबई
२. संचालक (वित्त) / (संचलन) / (प्रकल्प) / (वाणिज्य) / (मासं), महावितरण सांघिक कार्यालय, मुंबई

**प्रत :**
**सर्व संघटना पदाधिकारी:-**

- आपणांस कळविण्यात येते की, उपरोक्त मेडिक्लेम योजना माहे ऑक्टोबर २०२४ ते माहे ऑक्टोबर २०२५ या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या व होणाऱ्या कर्मचाऱ्यांपर्यंत जास्तीत जास्त पोहचवावी, जेणेकरुन त्यांना सदर योजनेचा लाभ घेणे शक्य होईल.

**प्रत माहितीस्तव सादर :-**
श्री. सचिन खानविलकर, व्यवस्थापक, दि ओरिएन्टल इन्शुरन्स कंपनी लि. चर्चगेट, मुंबई